# शुभेच्छा

एका कालखंडात युवकांच्या संस्थानी रंगवलेली स्वप्ने मला ठाउक होती. मी त्यांचा साक्षीदार आहे. वयाच्या ८४व्या वर्षी तरुणाईच्या स्वप्नांची दीपमाळ विझलेली मी पाहतो आहे. अशा परिस्थितीत युक्रांद नवे स्वप्न पाहत, नव्या स्वरुपात उभे राहत आहे. माझी खात्री आहे की, नव्या स्वरुपात येणाऱ्या युक्रांदचे भारतीय समाज कृपाळु स्वागत केल्याशिवाय राहणार नाही.युक्रांदच्या पराक्रमी पण सुकुमार आठवणींचे सुखद स्मरण करुन मी युक्रांदच्या पुढील वाटचालीला शुभेच्छा देतो, आशिर्वाद देतो.

आपण सर्वजण जाणतो की कोणतेही राष्ट्र तरुणाईच्या भक्कम खांद्यावरच उभे असते. एकविसावे शतक उजाडल्याबरोबर क्षितिजावर धुराचे लोट दिसु लागले आहेत. सारे राजकिय विचारवंत सांगत आहेत की, हजारो वर्षाच्या परिश्रमाने निर्माण झालेली मानवी संस्कृती संकटात आहे, नव्हे ती तुटण्याच्या उंबरठ्यावर उभी आहे. पृथ्वीवरील मानवतेचे अस्तित्व टिकवण्यासाठी अजुन बापुजींचा क्षीण आक्रोश ऐकू येतोय. बापुजींचा तो आवाज युक्रांद ऐकू शकेल का? मानवतेचा तो सुर युक्रांद पुन्हा पकडू शकेल का? गरज अन लोभ, need and greed यांच्यामधील आंतरीक विसंगती नेमकी ओळखून तुम्हाला संघर्ष करावा लागेल.

पुन्हा अंकुरण्यासाठी न शरमणारे युक्रांदचए बीज आहे. बीज मूकपणे एक वचन देते. ते म्हणते. अनुरुप परिस्थिती लाभली की अंकुरण्याची मी लाज बाळगणार नाही. संघटना पुन्हा सुरु होत असताना तिची दिशा निश्चित असावी. मोठ्या आकाराच्या मोहापायी युक्रांदने दिशा गमावु नये. शिकार कशाची करायची हे निश्चित आहे. निबीड जंगलात धावायचे आहे; पण दिशा ठरलेली आहे. शिकारीचे धैर्य आहे, हातात गांडिव आहे, पाठीवर भाता आहे. पण त्या भात्यात संवेदनांचे शर भरपुर असावेत. संवेदनांचे शर नसतील तर शिकार कशी करणार?

संवेदनांचे शर हरवुन बसलेल्या तरुणाईचा हा समाज आहे. त्यात युक्रांदला काम करायचे आहे. राजकारण की विधायक काम हे द्वंद्व सामोरे येईल. तो आभास आहे, चकवा आहे. विधायक वृत्तीशिवाय राजकारण वांझोटे आहे अन राजकारणाशिवाय विधायक कार्य नपुंसक आहे. राजकीय भुमिका असावी; पण राजकारणी म्हणजे डावपेची बनू नये.

प्रत्यक्ष कृतीशिवाय तत्वांना, विचाराना किंमत नसते. आचरणाशिवाय वाणी पोकळ ठरते. शरणागतीत कसलेही भविष्य नसते. भविष्याची आशा दडलेली असते ती कृतीमध्ये! युवकानो, जुन्या पिढीच्या दोषांची रंगीत तालीम पुन्हा करु नका. No more rehearsal of old grievances.

मला खात्री आहे की, युक्रांद आपल्या वाणीने आणि आचरणाने भविष्यकाळ अधोरेखित कराल. सत्याग्रही मासिकासारखे एक प्रभावी मुखपत्र हाती असल्यामुळे युक्रांदच्या कार्याला त्याचा नक्की उपयोग होईल.

संकटाना हसत सामोरे जाण्यामध्ये सामर्थ्य असते. Power of smile in tears अचाट असते. देशाच्या युवाशक्तीचे खरे सामर्थ्य वचन आणि वचनपुर्ती यातील अंतर शुन्य करण्यात सामावलेले असते. गतीच्या युगात अगतिक होऊन हात बांधून बसणे हा तरुणाईचा धर्म नव्हे. तरुणांचे उसासे मानवतेच्या मधुर सुरांमध्ये बेसूर वाटतात. निरुपयोगी ठरतात.

मला ठाउक आहे की कठीण, खडकाळ, बधीर, नापीक जमिनीतून युक्रांदला नव्या स्वप्नांचे पीक घ्यायचे आहे. मला आशा आहे की युक्रांद उत्तम मशागत करुन नापीक जमिनीला उपजाऊ करील.

खरा नाविक तोच की, जो वादळाला घाबरत नाही, जो प्रतिकूल वाऱ्यांच्या झोतातही आपली नाव पुढे नेतो. युक्रांदच्या झेंड्याखाली वादळ गटागट पिणारी एक नवी पिढी निर्माण होण्याची मी अपेक्षा करतो.

काळ्याशार ढगानी वेढलेल्या आकाशात लखलखीत वीज चमकावी तशी युक्रांदची चळवळ एकेकाळी होऊन गेली.हा वीजेचा प्रकाश आता टिकाऊ व्हावा ही अपेक्षा आहे.

Storm is your banner
Walk forward together
Mankind always judges you
by your deeds, not by your longevity

तुमची संघटना किती दिर्घकाळ टिकेल यापेक्षा तुम्ही काय करता यावर तुमचे मोल ठरणार आहे. पोकळ दिर्घायुष्य काय कामाचे?

एकविसाव्या शतकाच्या प्रारंभीच्या काळातील युक्रांद नविन कल्पना, नवा जोश, दुर्दम्य उत्साह घेउन सुरु व्हावे ही माझी अपेक्षा आहे. नव्या शतकाच्या मागण्या, गरजा, वेगळ्या असतील, त्यांच्याकडे युक्रांदने पाठ फिरवू नये. युक्रांदने नविन वाटचाल नैसर्गीक साधेपणा, रोमारोमात ओसंडणारा उत्साह, जिवंतपणा, ठाम निर्धार आणि समर्पित प्रामाणिकपणा या गुणांची कास धरुन करावी.

माझे अंतःकरण सर्वश्रेष्ठ प्रेम भावनेने ओतप्रत भरु देत.माझ्या वाणीला लोकांची दु:ख बोलती करण्याचे धैर्य लाभु देत.त्रास, अडचणी सहन करण्याची इच्छा व शक्ती मिळू दे. संकटाच्या उंबरठ्यावर शक्तीमान कर. लोकांच्या वेदना माझ्या अंतःकरणात उमटू देत. त्या वेदनानी मला सन्मानीत होऊ देत. त्यागासाठी आत्मबळ मिळू दे. कठीण चढण पार करायला आत्मविश्वास लाभू दे. पराभव पचवण्याचे आंतरिक सामर्थ्य माझ्याजवळ असू दे. मरणातही संजीवनी लाभू दे.

युक्रांद पुर्वीपेक्षा आधिक परिणामकारक व गतिमान होवो हाच आशिर्वाद!